

नंदुरबार : जिल्ह्यात झाडावर लाल झालेल्या मिरचीची तोडणी वेगात सुरू आहे. शेतांमध्ये मजूर, खरेदीदार, शेतकरी यांचा मोठा राबता असतो. मिरचीचा हंगाम अंतिम टप्प्यात असून, ओल्या लाल मिरचीला वाळविण्यासाठी खरेदीदार नंदुरबार शहरात पथारी लावत आहेत.

# बियाणे परवान्याचे अधिकार 'एसएओ'कडे

**पुणे(प्रतिनिधी) :** जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडून बियाणे परवाने वाटपाचे अधिकार शासनाने अखेर काढले आहेत; मात्र खते विक्री परवान्याचे अधिकार जिल्हा परिषदेकडे कायम ठेवल्यामुळे कृषी विभागातून आश्चर्य व्यक्त केले जात आहे. कृषी खात्याचे प्रधान सचिव बिजयकुमार यांनी आता राज्यातील सर्व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांनाच बियाणे परवाना अधिकारी म्हणून घोषित केले आहे. यामुळे बियाणे परवाने वाटप व नूतणीकरणातील राजकीय हस्तक्षेप संपुष्टात येणार आहे.

विदर्भात कीटकनाशक विषबाधा प्रकरणानंतर जिल्हा परिषदेच्या कृषी विभागांमधील परवाने वितरणाचा भोंगळ कारभार उघड झाला होता. त्यामुळे कीटकनाशके, खते आणि बियाणे विक्रीचा अधिकार झेडपीकडून काढून घेण्याचा प्रस्ताव कृषी आयुक्तालयाने शासनाला दिला होता. या प्रस्तावाची अंमलबजावणी मात्र एकदम करण्यास शासन तयार नाही. कारण, खत परवान्यांचे अधिकार वर्ग करण्याबाबत अजूनही घोळ सुरू आहे.

शासनाने २४ नोव्हेंबरला एक अधिसूचना काढून जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडून कीटकनाशक परवाना वितरणाचे काम काढून घेतले. आता पुन्हा सहा जानेवारीला बियाणे परवाने वितरणाचे अधिकार काढले आहेत. यामुळे झेडपीचा 'जिल्हा कृषी विकास अधिकारी' आता फक्त खते विक्रीचा परवाना देऊ शकेल, असे सूत्रांचे म्हणणे आहे.

खते, बियाणे, कीटकनाशक विक्री परवाने वितरणात झेडपीमधील राजकीय मंडळी सतत हस्तक्षेप करतात. त्यामुळे परवाना वितरणात गोंधळ निर्माण होतो व गुणनियंत्रणदेखील व्यवस्थित होत नसल्याच्या तक्रारी येत होत्या.

"परवान्यांच्या भानगडीतून झेडपीचा कृषी विभाग बाहेर पडला तर कृषी योजना आणि विस्तार कामे करण्यास या विभागाला वेळ देता येईल. त्यामुळे आता खत परवान्याचे अधिकारही झेडपीकडून काढून घेण्यासाठी आमचा पाठपुरावा सुरू आहे, अशी माहिती कृषी विभागाच्या सूत्रांनी दिली.

# दराच्या तिढ्यामुळे खानदेशात पपईची काढणी ठप्प

**धुळे (प्रतिनिधी) :** पपईच्या दराचा तिढा निर्माण झाल्याने धुळे व नंदुरबार जिल्ह्यांतील पपईची तोडणी किंवा काढणी शेतकऱ्यांनी बंद ठेवली आहे. जोपर्यंत व्यापारी आठ रुपये प्रतिकिलोचा दर देणार नाहीत, तोपर्यंत शेतातून पपईची तोडणी होऊ देणार नाही, असा पवित्रा शेतकऱ्यांनी घेतला आहे.

धुळे व नंदुरबार जिल्ह्यात पपईची तापी काठावरील गावांमध्ये लागवड अधिक आहे. धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यात तऱ्हाडी, निमझरी, बलकुवे, अर्थे आदी भागात पपईची लागवड अधिक आहे. नंदुरबार जिल्ह्यात शहादा तालुक्यातील मनरद, नांदरखेडा, प्रकाशा, वडछील, म्हसावद, जयनगर, मोहिदे आदी भागात पपई लागवड आहे. नंदुरबार तालुक्यातील समशेरपूर, शिंदे, लहान शहादे, पिंपळोद भागात लागवड आहे. मागील महिनाभरापासून पपई दरांचा तिढा या भागात आहे. व्यापारी शहादा व शिरपूर बाजार समितीला जुमानत नसल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी केल्या आहेत. शेतकऱ्यांना शेतातच किंवा जागेवरच आठ रुपये प्रतिकिलो दर हवा आहे. व्यापारी पाच रुपये ५५ पैसे प्रतिकिलो, असा दर पपईला देत आहेत. व्यापारी जो दर देत आहेत, तो शेतकऱ्यांना मान्य नाही, अशी माहिती शेतकऱ्यांनी दिली.

## बैठकीकडे व्यापाऱ्यांची पाठ

पपई दरांचा तिढा लक्षात घेता रविवारी (ता. २८) शहादा (जि. नंदुरबार) येथील बाजार समितीमध्ये व्यापारी व शेतकरी आणि बाजार समिती प्रशासनाने बैठक बोलावली; परंतु या बैठकीकडे व्यापाऱ्यांनी पाठ फिरविली. यामुळे शेतकरी संतप्त झाले असून, जोपर्यंत व्यापारी तोडगा काढण्यासंबंधी सकारात्मक भूमिका घेणार नाहीत, तोपर्यंत पपईची तोडणी करू देणार नाही, असे शेतकऱ्यांनी म्हटले आहे. रविवारीच अनेक शेतकऱ्यांनी तोडे बंद ठेवले.

> व्यापारी फक्त पाच रुपये ५५ पैसे प्रतिकिलो दर देत आहेत. रोजची २०० ट्रक पपई उत्तर प्रदेश व मध्य प्रदेशात शहादा आणि शिरपूर भागांतून जाते. ही सर्व वाहतूक व पपईची विक्री शेतकऱ्यांनी बंद ठेवली आहे.
>
> – **रोहित पाटील,** पपई उत्पादक, वडछील (ता. शहादा, जि. नंदुरबार)

# शेतकऱ्यांसाठी सर्व योजना ऑनलाइन करा : आयुक्त



**पुणे (प्रतिनिधी) :** राज्यातील शेतकऱ्यांपर्यंत कृषी विभागाच्या योजना सहज पोचण्यासाठी सर्व योजनांची अर्जप्रक्रिया ऑनलाइन करावी, अशा महत्त्वपूर्ण सूचना कृषी आयुक्त सच्चिंद्र प्रताप सिंह यांनी दिल्या आहेत.

ऑनलाइन कामकाजामुळे शेतकऱ्यांना मध्यस्थांवर अवलंबून राहावे लागत नाही, तसेच योजनादेखील पारदर्शकपणे राबविल्या जातात, असे आयुक्तांचे म्हणणे आहे. कृषी खात्याचे प्रधान सचिव बिजय कुमार यांनी ऑनलाइन कामकाजाला प्राधान्य देण्याच्या सूचना यापूर्वीच दिलेल्या होत्या.

"सध्या योजनांसाठी भरपूर निधी उपलब्ध आहे. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत योजनेचे लाभ पोचविण्यासाठी कर्मचाऱ्यांनी मरगळ झटकून कामाला लागावे," अशी भूमिका आयुक्तांनी घेतली आहे.

"आर्थिक वर्षाची समाप्ती अर्थात 'मार्चएन्ड'जवळ आला असून, अनेक योजनांमधील निधी पूर्णतः खर्च झालेला नाही. त्यामुळे आयुक्त याविषयी गंभीर आहेत. ते स्वतः राज्यभर बैठका घेऊन योजना व खर्चाचा आढावा घेत आहेत. अलीकडेच आयुक्तालयात सुटीच्या दिवशीदेखील आयुक्तांनी राज्यस्तरीय बैठका घेत योजनांचा आढावा घेतला. शेतकऱ्यांपर्यंत योजनांचे लाभ ऑनलाइन पद्धतीने पोचविण्यात कमी अडचणी येतात. त्यामुळे सर्व योजनांची अर्जप्रक्रिया ऑनलाइन करण्याचा आग्रह आयुक्तांनी या वेळी धरला," अशी माहिती सूत्रांनी दिली.

राज्यातील सूक्ष्म सिंचन योजना, नियंत्रित शेती, कांदाचाळ, कृषी यांत्रिकीकरण, सामूहिक शेततळे, मागेल त्याला शेततळे अशा विविध योजनांमध्ये निधी उपलब्ध आहे. मात्र, लाभार्थ्यांची संख्या वाढलेली नाही. त्यामुळे मार्चअखेरपर्यंत लक्ष्यांक पूर्ण करावेत व जास्तीत जास्त निधी नियमानुसार खर्च व्हावा, अशा सूचना आयुक्तांनी दिल्याचे सांगण्यात आले. पाणलोट विकास, जलयुक्त शिवार, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, गुलाबी बोंड अळी, उन्नत शेती समृद्ध शेतकरी अभियान आणि राष्ट्रीय फलोत्पादन अभियानातील कामाचा आढावादेखील आयुक्तांनी या बैठकांमध्ये घेतला.

## आयुक्तांनी केलेल्या सूचना

- प्रत्येक जिल्ह्याचा आराखडा तयार करण्याच्या सूचना -
- राज्यातील प्रत्येक जिल्ह्याचा कृषीविषयक नियोजनाचा पाच वर्षांचा आराखडा तयार होणार. त्यात फलोत्पादन, प्रक्रिया व निर्यातीला प्राधान्य मिळणार
- गटशेतीचे अनुदान वापरण्यासाठी लक्ष्यांकानुसार लाभ घेण्यासाठी जास्तीत जास्त शेतकरी गटाचे प्रस्ताव सादर होणार.
- मागेल त्याला शेततळे योजनेतील अर्धवट कामे पूर्ण करण्यासाठी हालचाली केल्या जातील.
- मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांच्या सहली पश्चिम महाराष्ट्रात घडवून आणून प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न होणार
- दापोली, औरंगाबाद, नागपूर, बारामती, तळेगाव येथील सेंटर ऑफ एक्सिलेंन्स येथे शेतकरी भेटींचे आयोजन
- अनुसूचित जाती व जमातीमधील शेतकऱ्यांनी विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी केलेल्या अर्जांना प्राधान्याने पूर्वसंमती मिळणार.





सकाळ अॅग्रोवन आयोजित | Kubota कृषिराज ट्रॅक्टर्स, लातूर प्रायोजित

सकाळ अॅग्रोवन संवाद

'अॅग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद

कार्यक्रम वेळापत्रक

**बुधवार, ३१ जानेवारी २०१८**

**विषय : ऊस लागवड व रब्बी हंगाम कीड नियंत्रण व्यवस्थापन**

**वक्ते : डॉ. व्ही. के. भामरे**

(सहयोगी प्राध्यापक वनस्पती कीटक शास्त्रज्ञ, कृषी महाविद्यालय, लातूर)

**डॉ. सचिन दिग्रसे**

(प्रमुख शास्त्रज्ञ, मांजरा कृषी विज्ञान केंद्र, लातूर)

**श्री. चितांबर गाडवे**

(संचालक, कृषिराज ट्रॅक्टर्स, लातूर)

**स्थळ : ग्रामपंचायत समोर, करडखेल, ता. उदगीर, जि. लातूर**

**वेळ : सायंकाळी ६.३० वाजता**

या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.